# संजीवनच्या एन. एस. एस. विभागाकडून संभाजी महाराज मंदिराची स्वच्छता –




**पन्हाळा : प्रतिनिधी**

सोमवार पेठ (ता. पन्हाळा) येथील संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (एन. एस. एस.) विभागाच्या विद्यार्थ्यांमार्फत पन्हाळा येथील संभाजी महाराज यांच्या मंदिराची स्वच्छता करण्यात आली. गुरुवार दि. १० रोजी सकाळी दहा वाजता स्वच्छता अभियान कार्यक्रम घेण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना चे समन्वयक प्रा. रणजीत इंगवले यांनी विद्यार्थ्यांना सूचना दिल्या. त्यानुसार विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियानास सुरुवात केली. यावेळी मंदिरातील कचरा, प्लास्टिक, झाडांचा पडलेला पाला–पाचोळा, मंदिराच्या भिंतीवर वाढलेले गवत व झाडे–झुडपे काढून स्वच्छता करण्यात आली.

सदरचा सर्व कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली. सदर स्वच्छता अभियानासाठी महाविद्यालायातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील सर्व विद्यार्थी–विद्यार्थीनी यांच्यासह सर्वांनी उस्पुर्थपणे सहभाग घेतला. राष्ट्रीय सेवा योजना चे समन्वयक प्रा. रणजीत इंगवले, प्रा. राहुल नेजकर, नितीन बहादुरे, विद्यार्थी प्रतिनिधी दिग्विजय पाटील यांनी स्वच्छता अभियानाचे शिस्तबद्ध नियोजन केले. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन बी. वनरोट्टी यांच्यासह संस्थेचे चेअरमन पी. आर. भोसले आणि सहसचिव एन. आर. भोसले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

**फोटो ओळ** –

**पन्हाळा :** येथील संभाजी महाराज मंदिराची स्वच्छता करताना विद्यार्थी–विद्यार्थीनी, प्रा. रणजीत इंगवले व मान्यवर